गोदातीर दि 3.9.25

# नांदेड परिक्षेत्रात ऑगस्ट महिन्यात आणखी १ हजार १५५ कारवाया, ३ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)- परिक्षेत्रात सुरु असलेल्या अवैध दारू, मटका, जुगार, ऑनलाईन लॉटरी, क्रिकेट बेटिंग, गुटखा, अमली पदार्थ, वेश्या व्यवसाय, वाळू उत्खनन व वाहतुक, अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींना आळा घालण्यासाठी, पोलीस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी दिनांक १ मेपासून नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी अभियान सुरु केले आहे. या अभियानांतर्गत ऑगस्ट महिन्यात नांदेड परिक्षेत्रात जवळपास १ हजार १५५ कारवाया करून ३ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



पोलिसांनी, नांदेड परिक्षेत्रात मे, जून व जुलै महिन्यांत राबविलेल्या अवैध व्यवसाय विरोधी अभियान - १, अभियान -२ व अभियान -३ दरम्यान, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या ६ हजार १६३ इसमांविरुध्द एकूण ५ हजार ६१८ केसेस करुन २७ कोटी ४० लाख ५५ हजार ७९३ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला होता. सदर कारवाईनंतर, परिक्षेत्रात, ऑगस्ट महिन्यात अवैध व्यवसाय विरोधी अभियान अभियाना दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैधव्यवसायिकांविरुध्द आणखी १ हजार १५५ केसेस करुन मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ऑगस्ट महिन्यात परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांनी ही मोहीम राबविली होती. या मोहिमेअंतर्गत ३ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात नांदेड जिल्ह्यात ३१० गुन्हे दाखल करून ४४३ आरोपींकडून १ कोटी एक लाख २३ हजार ७० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. लातूर जिल्ह्यात २३० गुन्हे दाखल करून ३६७ आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून १ कोटी ३४ लाख ५१ हजार ५५६ रुपये, परभणी २९७ गुन्हे दाखल करून ३७८ जणाकडून ६२ लाख ६६ हजार ७४३ आणि हिंगोली जिल्ह्यांमध्ये ३१८ गुन्हे दाखल करून ३३० जणांकडून ४० लाख ६१ हजार २६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोस्टे किनगाव जि. लातूर यांनी १६ लाख १ हजार१०० रुपयांचा गुटखा जप्त करून चांगली कामगिरी केली आहे. सदर कामगिरीबाबत, पोलीस उपमहानिरीक्षक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

आजवर राबविण्यात आलेल्या चार अभियानांतर्गत, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या (५३) इसमांना परभणी, लातूर व हिंगोली पोलिसांनी हद्दपार केले असून नांदेड पोलिसांनी हातभट्टी दारु व्यवसायाशी निगडित एका इसमास (एमपीडीए) कायद्याखाली एक वर्षासाठी स्थानबध्द केले असून दि. १७ जून २०२५ रोजी त्याची रवानगी छत्रपती संभाजीनगर कारागृहात करण्यात आली आहे.

दि. १ सप्टेंबरपासून परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी अवैध व्यवसाय विरोधी अभियान - ५ राबविण्यात येत असून संपुर्ण सप्टेंबर महिन्यात हे अभियान सुरु राहील. सदर मोहिमेदरम्यान, गुटखा बंदीसाठी वाहन व साठवणूक ठिकाणांच्या तपासणीची व्यापक मोहिम हाती घेण्यात येणार आहे.

नागरिकांना अवैध व्यवसायांची माहिती देणे सुकर व्हावे म्हणून परिक्षेत्रीय कार्यालयाकडून ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' ही हेल्पलाईन उपलब्ध करुन देण्यात आली असून नागरिकांनी अवैध व्यवसायांची माहिती सदर हेल्पलाईनवर फोन करुन किंवा व्हॉटसअॅपवर द्यावी, माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर किंवा ९१५०१ ००१०० या हेल्पलाईनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.